आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२४ जून २०२६ -बुधवार

**ठळक बातम्या**

- बदलत्या जागतिक परिस्थितीत, दहशतवाद आणि सायबर सुरक्षेपासून ते उदयोन्मुख तंत्रज्ञानापर्यंतच्या सामायिक आव्हानांचा सामना करण्यासाठी 'ब्रिक्स'ची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- इराण-अमेरिका कराराबाबत आखातातल्या मित्रदेशांना आश्वस्त करण्यासाठी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो तीन दिवसांच्या दौऱ्यावर

- इराणमधली परिस्थिती सुधारत असली तरी तिथल्या भारतीयांनी सावधगिरी बाळगावी अशी इराणमधल्या भारतीय दूतावासाची सूचना

- महाराष्ट्रात बाल विवाह रोखण्यासाठी लग्न पत्रिकेत वर आणि वधूची जन्मतारीख नमूद करण्यासाठी शासन  प्रयत्नशील

**आणि**

- महाराष्ट्रात मुंबईसह अनेक ठिकाणी मान्सून सक्रीय, मुंबईत जनजीवनावर परिणाम

**<><><><><>**

बदलत्या जागतिक परिस्थितीत, दहशतवाद आणि सायबर सुरक्षेपासून ते उदयोन्मुख तंत्रज्ञानापर्यंतच्या सामायिक आव्हानांचा सामना करण्यासाठी आणि सुरक्षा सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी 'ब्रिक्स'ची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. प्रधानमंत्र्यांनी काल नवी दिल्ली इथं ब्राझील, रशिया, चीन आणि दक्षिण आफ्रिका या 'ब्रिक्स' देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्यांची भेट घेतली. भारताच्या 'ब्रिक्स' अध्यक्षपदाच्या कार्यकाळात व्यावहारिक सहकार्य वाढवणं, 'ग्लोबल साउथ' अर्थात विकसनशील देशांसाठीच्या प्राधान्यक्रमांना पाठिंबा देणं, अधिक सुरक्षित आणि सर्वसमावेशक जगाच्या निर्मितीमध्ये योगदान देणं या गोष्टींवर भर दिला जाईल, असं त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे.

दरम्यान, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि रशियाचे सुरक्षा सल्लागार सर्जी शोईगु यांनी सहकार्याबाबत, तसंच रशियाने मांडलेल्या प्रस्तावांवर चर्चा केली. दिल्लीत

आयोजित १६ व्या 'ब्रिक्स' राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या बैठकीदरम्यान त्यांची भेट झाली. भारत-रशिया यांच्यातील 'विशेषाधिकारप्राप्त धोरणात्मक भागीदारी'नुसार, विविध क्षेत्रांतील द्विपक्षीय सहकार्याच्या प्रगतीचा त्यांनी आढावा घेतला.

<><><><><>

इराण- अमेरिका कराराबाबत आखातातल्या मित्रदेशांना आश्वस्त करण्यासाठी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो तीन दिवसांच्या दौऱ्यावर निघाले आहेत. प्रथम ते संयुक्त अरब अमिरातीत अबुधाबी इथं भेट देत असून नंतर कुवैत, आणि बहारिनला जाणार आहेत. नंतर ते आखाती देशांच्या सहकार्य संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतील. होर्मुझच्या सामुद्रधुनीमार्गे जाणाऱ्या जहाजांवर इराणला कर लावू दिला जाणार नाही असं रुबियो यांनी स्पष्ट केलं आहे.

इराण आणि अमेरिकेदरम्यान स्वित्झर्लंड इथं चर्चेची पहिली फेरी समाधानकारक आणि सकारात्मक वातावरणात पार पडली.

<><><><><>

इराणमधली परिस्थिती हळूहळू सुधारत असली तरी इराणमधे राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी किंवा ज्यांना इराणला जाणं अत्यावश्यक आहे अशा नागरिकांनी प्रवास करताना सावधगिरी बाळगावी, चालू घडामोडींची माहिती ठेवावी अशा सूचना इराणमधल्या भारतीय दूतावासाने जारी केल्या आहेत. आवश्यक काम नसेल तर इराणला जाणं टाळावं असं भारतीय दूतावासाने सांगितलं आहे. इराणमधे राहणाऱ्या आणि इराणला येणाऱ्या भारतीय नागरिकांनी दूतावासाकडे नोंदणी करावी, तसंच माहिती आणि सूचना पाहण्यासाठी दूतावासाचं संकेतस्थळ आणि समाजमाध्यम खातं पाहत राहावं असंही दूतावासाने म्हटलं आहे.

कोणतीही मदत हवी असल्यास ९८ ९१ २८ १० ९१ ०९ या क्रमांकावर किंवा cons.tehran@mea.gov.in ईमेलवर संपर्क साधावा असं आवाहन केलं आहे.

<><><><><>

काश्मीरचा मुद्दा पाकिस्तानने संयुक्त राष्ट्रांच्या मंचावर उपस्थित करण्यावर भारताने तीव्र आक्षेप घेतला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षापरिषदेतल्या कार्यगटात सहअध्यक्ष म्हणून स्थान मिळाल्याचा पाकिस्तान गैरफायदा घेत असल्याचं भारताचे स्थायी प्रतिनिधी पर्वतनेनी

हरीश यांनी म्हटलं आहे. जम्मू काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून त्याविषयीचे सर्व मुद्दे देशाचे अंतर्गत प्रश्न असल्याचं त्यांनी कार्यगटाच्या बैठकीत स्पष्ट केलं.

<><><><><>

पारपत्र सेवा कार्यक्रम २.० अंतर्गत चिप असलेल्या ई-पारपत्राची सुरुवात, नवीन पारपत्र केंद्र आणि टपाल कार्यालय पारपत्र सेवा केंद्रं सुरू करणं, अशा विविध उपक्रमांमुळे प्रवासात सुलभता तसंच जागतिक संधींची उपलब्धता वाढत असल्याचं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी केलं. चौदाव्या पारपत्र सेवा दिनानिमित्त त्यांनी आपल्या समाज माध्यमाद्वारे देशभरातल्या तसंच परदेशातल्या सर्व पारपत्र प्राधिकरणांना शुभेच्छा दिल्या आहेत. 'सुरक्षित पारपत्र, सुगम सेवा, सशक्त नागरिक' या ध्येयानुसार पारपत्र सेवांची अंमलबजावणी अधिक जलद, पारदर्शक आणि सुलभ करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचंही डॉ. जयशंकर यांनी अधोरेखित केलं.

<><><><><>

अमेरिकेचं लांगूलचालन करणं आणि चीनसमोर शरणागती पत्करणं हेच मोदी सरकारचं अर्थकारण आहे, अशी टीका काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे केली आहे. भारताची अमेरिकेला होणारी निर्यात २०२४-२५ ला ४० अब्ज डॉलरपेक्षा जास्त होती ती २०२५-२६ मधे ३४ अब्ज डॉलर इतकी झाली तर चीनसोबतची व्यापारी तूट ११२ अब्ज डॉलर झाली आहे, असं जयराम रमेश म्हणाले.

<><><><><>

महाराष्ट्रात बाल विवाहाचं प्रमाण कमी करण्यासाठी लग्न पत्रिकेत वर आणि वधूची जन्मतारीख नमूद करण्यासाठी विधी आणि न्याय तसेच ग्रामविकास विभागांच्या मदतीने कार्यवाही करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत दिली. राजस्थानमध्ये बालविवाह रोखण्यासाठी ही पद्धत सुरू आहे. गेल्या वर्षी राज्यात सुमारे पंधराशे आणि चालू वर्षात आतापर्यंत चौदाशेहून अधिक बालविवाह रोखण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार २०१९-२१ या कालावधीत देशात बालविवाहाचे प्रमाण २३ टक्क्यांपेक्षा जास्त आणि राज्यात सुमारे २२ टक्के होते. २०२३-२४ मध्ये काही जिल्ह्यात झालेल्या सर्वेक्षणानुसार हे प्रमाण देशात २० पूर्णांक १ दशांश टक्के तर राज्यात १९ पूर्णांक ७ दशांश टक्के झाल्याची माहिती त्यांनी

विधानसभेत दिली. गेल्या आर्थिक वर्षात राज्यात ५ वर्षाखालील १२ हजार ७२९ बालकांचा आणि गेल्या ३ वर्षात ४० हजार ५५९ बालकांचा मृत्यू झाला आहे. मुदतपूर्व जन्म, जंतू संसर्ग, न्यूमोनिया वगैरे कारणामुळे हे मृत्यू झाले आहेत. हे प्रमाण कमी करण्यासाठी सरकारकडून विविध उपाय योजना सुरू असल्याची माहिती सरकारने विधानसभेत लेखी उत्तरात दिली आहे.

दरम्यान, गेल्या ३ वर्षापासून राज्यातल्या कुपोषित बालकांचे प्रमाण कमी होत असल्याची माहिती सरकारने दिली आहे.

बोगस डॉक्टरांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्याचं सरकारचं नियोजन असल्याचं आश्वासन मंत्री वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत दिलं.

दरम्यान, पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी शोक प्रस्ताव वाचताना झालेल्या चुकांबद्दल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. छापील भाषणाची प्रत अस्पष्ट होती, त्यात काही चुका होत्या त्यामुळे वाचताना चूक झाल्याचं ते म्हणाले. कोणाच्याही भावना दुखावण्याचा उद्देशाने नव्हे तर चुकून हे झाल्याचं त्यांनी मान्य केलं. इतरांच्या इतकाच मराठी भाषेचा अभिमान आहे आणि यापूर्वी अनेक भाषणे मराठीत केली आहे याकडेही त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

तत्पूर्वी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अनियमितता झाल्याचा आरोप करत विरोधी पक्ष सदस्यांनी विधान भवन परिसरात निदर्शनं केली.

**<><><><><>**

राज्यात सर्व 100 टक्के फीडर्सवर स्मार्ट मीटर्स लावण्यात आले असल्याची आणि एकंदर ग्राहकांपैकी फक्त १३ शतांश टक्के लोकांनाच ग्रिड सपोर्ट चार्जेस लावले असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. सतेज पाटील यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. हा ग्रीड सपोर्ट चार्ज या वर्षीच्या १ फेब्रुवारीपासून लावला असून पूर्वलक्ष्यी प्रभावाने लावलेला नसल्याचं त्यांनी सांगितलं. आजूबाजूच्या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात विजेचा दर कमी आहे आणि वर्ष २०२९-३०पर्यंत ते ७ रुपये ४३ पैसे इतकं खाली येईल, जे २० वर्षांच्या कलानुसार १४ रुपये असायला हवं, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

वर्ष २०२९-३०पर्यंत राज्याची ५२ टक्के वीज ही नवीकरणीय असेल, असं त्यांनी सांगितलं. ग्राहकांवर बोजा पडता कामा नये, हीच सरकारची भूमिका असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पावसाने महाराष्ट्रात दमदार हजेरी लावली असून राजधानी मुंबई सह अनेक ठिकाणी कालपासून पावसाची संततधार आहे. दीर्घ प्रतीक्षेनंतर आलेल्या पावसामुळे तापमान कमी होऊन मुंबईकरांना उकाड्यापासून दिलासा मिळाला. ऐकूया वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून....

- **- - होल्ड - VC - - -**

*(मुंबई शहर आणि उपनगरात कालपासून सूर्यदर्शन झालं नाही. संततधार पावसामुळे शहराच्या सखल भागात पाणी साचून वाहतुकीला अडथळे होत आहेत. रेल्वे रुळावर पाणी साचल्यानं  रेल्वे वाहतूकही प्रभावित झाली आहे. ट्रान्सहार्बर मार्गावर रुळाखाली जमीन खचल्यामुळे काही काळ तिथली सेवा बंद ठेवली होती. रस्त्यांवरची वाहतूकही अनेक ठिकाणी खोळंबली होती. महापौर रितू तावडे यांनी किंग्ज सर्कल परिसरात जाऊन परिसराची पाहणी केली. साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी उपसा पंप पूर्ण क्षमतेने कार्यरत असून इतर ठिकाणीही महानगरपालिकेचे कर्मचारी पाणी उपसा करण्यासाठी कार्यरत आहेत असं त्यांनी सांगितलं.*

*मुंबई आणि पालघर जिल्ह्यांसाठी आज हवामान विभागानं मुसळधार पावसाचा रेड अलर्ट दिला असून, समुद्रकिनाऱ्यावर महाकाय लाटा उसळण्याची शक्यताही वर्तवली आहे. ताशी ८० किलोमीटर पर्यंत वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.)*

**//<><><><><>//**